**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2020, VOL- 8/62*

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे - आदर्श समाजसुधारक

**Maroti Subhashrao Phulari**

*Subject –History, At Post Mangalsangvi, Tahsil: Kandhar, Dist: Nanded Pincode 431714*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

भारतीय समाजसुधारणेत शंभर- दिडशे वर्षात जे विविध प्रवाह सुरु झाले त्यांचा संगम म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होय. त्यांनी समाजसुधारणा व राष्ट्रवाद यांचा सुवर्णमध्य साधला व्यांच्यावर देवेंद्रनाथ टागोर, राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव होता. महर्षी शिंदे यांचे व्यक्तीमत्वा ब्राम्ही व प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, शहर व खेडे या सर्वांना साधु पाहण्यासारखे होते. महर्षी वि.श. शिंदेचे जीवितकार्य म्हणजे बुद्धांचा अष्टांगमार्ग, गीतेचा कर्मयोग व येशू ख्रिस्तांचे उद्दात्त जीवन या त्रयीचे उत्तम उदाहरण होय. त्यानी बुद्धिवाद व श्रध्दावाद एकत्र आणला. धर्म आणि विज्ञान यांची सांगड घातली. व्यक्तिगत धर्म आणि सामूहिक धर्म यातील फरक सांगितला. महर्षी वि. रा. शिंदेचे जीवितकार्य हे आजही भारतीयांना मार्गदर्शक, प्रेरणादायी व दीपस्तंभ आहे यात तीळमात्र शंका नाही.

**शब्दसंज्ञा** : महर्षी, राष्ट्रवाद, अष्टांगमार्ग, कर्मयोग, धर्म इत्यादी.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

1. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विधायक व रचनात्मक कार्याचा आढावा घेणे.
2. वि. रा. शिंदेच्या सामाजिक सुधारणेचा अभ्यास करने.
3. महर्षी शिंदेनी मुलींच्या शिक्षणासाठी, मद्यपानाच्या बंदीसाठी आणि सामाजिक सुधारणासाठी विविध चळवळी चालविल्या त्यांचा अभ्यास करने
4. अस्पृश्यता निवारणाविषयीचीच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

## गृहीतके

1. महषी वि. रा. शिंदे यांचा लोकशिक्षण व लोकजागृती हा संदेश होता.
2. महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य प्रागतिकवादी व बुद्धिप्रामाण्यवादी होते.
3. महर्षी शिंदे यांनी बहुजनवाद हा विचार, संकल्पना भारतीय राजकारणाला प्रथमच दिली.

## संदर्भ साधनाची उपलब्धता

महर्षी वि. रा. शिंदे यांच्या जीवनकार्यावर संशोधनात्मक पेपर तयार करताना प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा वापर केला आहे. तसेच त्यांचे मित्र, सहकारी यांच्या लेखनीतून संशोधन पेपर लिहिला. समकालीन वृत्तपत्रे, ग्रंथ, अभ्यासपूर्ण लेख यांचा आढावा घेतला आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**विषय प्रवेश**

वि. रा. शिंदे गांचे जीवन सामाजिक सुधारणेसाठी वाहिलेले आधुनिक ऋषींचे जीवन होते. विधासप्पन, धीरोदत्त फकीरी बाण्याने समाजकार्य करणारा प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा पुरुष महाराष्ट्रात दुसरा आढळणार नाही. महर्षी शिंदे यांचे धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कार्यामध्ये अविभाज्य परस्पर संबंध होते. त्यांनी भारतातील विविध भागात धार्मिक कार्यात नव्या-जुन्या पंथामध्ये परस्परसंबंध बहुजन समाज आणि उच्चवर्णीय प्रंथामध्ये परस्परसंबंध स्थापत्याचा प्रयत्न केला. जीवनाबदलचा सर्वसमावेशक दृष्टीकोन हेच त्यांच्या जीवनकार्याचे महत्त्वाचे वैशिष्टे सांगता येतील. समाजाचा सर्वागिण विकास आणि त्यातही विशेष करून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा अशी महर्षी वि. रा. शिंदे यांची भूमिका होती. उदारमतवादाबरोबर महर्षींनी मुलींच्या शिक्षणासाठी मदयमानाच्या बंदीसाठी आणि सामाजिक सुधारणासाठी विविध चळवळी चालविख्या पुढील प्रगतीच्या दृष्टीने या सुधारणा मूलभूत २ल्या भारतातील सामाजिक सुधारणेच्या इतिहासात पुढील इतिहासकारांना महर्षी शिंदे यांना फार महत्वाचे स्थान द्यावे लागेल. महाराष्ट्रात 1850 पासून सुधारणेचे जे विविध प्रवाह सुरु झाले त्या सर्वांचा संगम म्हणजे वि. रा. शिंदे होय.

**प्रार्थना समाजातील कार्य**

महाराष्ट्रात प्रार्थना समाजाच्या प्रसाराने त्यांच्या कार्याचा प्रारंभ झाला. ठिकठिकानी एकेश्वरी परिषदेची पुनर्घटना केली. सेवांतर्गत कार्यात त्यांनी पोस्टल मिशन चालविले. प्रार्थना समाजातील स्त्री-पुरुषांना उत्तेजनासाठी तरुण ब्राम्ह संघ काढला (1905) त्यामुळे धर्मविषयक चळवळ, आध्यात्मिक व बौद्धिक जीवन यांची वाढ झाली. जनसंपर्क वाढविला. प्रार्थना समाजाकडून उदार धर्म ग्रंथ वाचनवर्ग चालविला. हायस्कूल व महाविद्यालयांच्या विदयार्थ्यांना मोलांच्या धर्मग्रंथाच्या वाचनाची सवय लावली. 1925 मध्ये पुणे येथे कौटुंबिक उपासना मंडळ काढले. त्यात प्रार्थना समाजाचे कार्य होत असे. वस्तीगृहे त्याला जोडून काढली. भारतभर दौरे काढले. धार्मिक उपासना ही सहकुटुंबाची व्हावी हे सूत्र महर्षींनी त्याद्वारे बिंबविले. प्रार्थना समाजाद्वारे मद्यपान बंदी चळवळ व होलिका संमेलन याही चळवळी राबविल्या. होळी मधील बीभत्स प्रकारांना आळा घातला.

महषी शिंदे यांनी ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज आणि सत्यशोधक चळवळ यांच्यात परस्परसंबंध स्थापन करण्याचा प्रयत्न केला. विविध चळवळींमध्ये परस्पर संबंध स्थापीत करणे आणि जीवनाबद्दलचा सर्वसमावेशक दृष्टीकोन हेच त्यांच्या जीवनकार्याचे महत्वाचे वैशिष्टे सांगता येईल. त्यांनी जातीजातीतील वैमनस्य, असंतोष दूर करण्यासाठी 'सत्यसमाज' नावाची चळवळ चालविली.

**शेतकरी चळवळीतील कार्य**

शेतकरी चळवळीतील कार्य धार्मिक कार्य समजूनच केले. शेतक-यांच्या प्रश्नावर महात्मा फुले यांनी 1883 मध्ये प्रथम विचार मांडले नंतर या विषयावर विचार मांडणारे वि. रा. शिंदे दुसरे होय. शेतकरी वर्गाची हिन-दिन पशिस्थती जवळून बघितली होती. शेतक-यांनी, मजुरानी परकीय सत्तेशी लहावे असा मंत्र त्यांनी दिला. पुणे, सातारा, चांदवड, बोरगाव, तेरकाळ इत्यादी जागी शेतकरी परिषदा घेतल्या. ब्रिटिश सेठ सावकार यांच्यावरती टिका केली.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शहरातील कामगारांप्रमाने आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी शेतक-यांनी संघटीत झाले पाहिजे. असा संदेश देतात.

**स्त्री जागृतींची दिशा व वि.श. शिंदे**

महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'मातृदेवो भव'च्या जागी स्त्री देवो भव' हा मूलमंत्र दिला. स्त्री-पुरुष म्हणून भेद करून वेगवेगळी वागणूक नको. स्त्री दैवत' ओळखून त्याची जोपासना करा व स्त्रीची दैवी शक्ती व गुण समजून घ्या. शेती, उद्योग, व्यापार, राजकारण, धर्मशासन इत्यादी क्षेत्रात स्त्रीया आघाडीवर असल्या पाहिजेत. 1919 मध्ये पुण्याला मुलींसाठी सक्तीचे शिक्षण करण्यासाठी त्यांनी स्त्रियांचा मोर्चा काढला. रमाबाई रानडे यांनी मदत केली. टीळकांचा विरोध पत्कारून हा मोर्चा होता. ब्रिटीश सरकारने मुलींच्या सक्तीचा शिक्षणाचा कायदा करावा यासाठी खेडोपाडी प्रचार-प्रसार केला 1904 मध्ये मुरळी प्रतिबंधक चळवळ उभारली. देवदासी निर्मूलन समित्या काढल्या.

**अस्पृश्यता निवारण कार्य**

महर्षी शिंदे यांना अस्पृश्योहदारक म्हणून ओळखतात. 'एकषष्ठांश भारत अस्पृश्य' हा सिद्धांत संपूर्ण भारतभर मांडला. त्यांनी समता, मानवता हा दृष्टीकोन ठेवला. अस्पृश्यता हा शब्द वापरू नये असा त्यांचा आग्रह होता. त्यानी 'दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय निराश्रीत साहाय्यकारी मंडळी) ही संस्था उभारली. न्या. नारायण चंदावरकर हे प्रथम अध्यक्ष होते. मद्रास, बंगाल, बिहार, मध्य प्रांतात त्यांनी कार्य केले. त्यांनी अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क नौक-या, व्यक्तिगत चारित्र्य प्राप्त व्हावे यासाठी प्रयत्नशील होते. प्रेम, सेवाभाव, त्याग हे त्यांच्या कार्याच्या मुळाशी होते. अस्पृश्यतेचा प्रश्न सामाजिक, धार्मिक व विशेषतः राजकीय जुलमाचा आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. 1918 ला मुंबई येथे त्यांनी अस्पृश्यता निवारण परिषद भरविली होती. 1924 ला त्रावणकोर संस्थानात अस्पृश्यता निवारण्याचा कार्यक्रम घेतला. दलितांच्या उन्नतीच्या कार्यात त्यांची बहिण जनावका हीनेही मोग सहभाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला कार्याला, संशोधनाला महात्मा शिदे यांनी पार्श्वभूमी तयार करून दिली. थोडक्यात दलित चळवळीत महर्षी शिंदे यांनी राष्ट्रीय वृत्तीची जोपासना केली.

**महर्षी शिंदे व बहुजनवाद**

'बहुजनवाद' हा शब्द भारतीय राजकारणाला महर्षी शिंदे यांनी दिला. शेतकरी, मजूर, सैनिक, कामगार, स्त्रिया अस्पृश्य, भटके लोक यांचा समावेश त्यानी बहुजन समाजात केला. सामाजिक समता, व एकमता साधून उद्दिष्टे साधने हे ध्येय होती.

शोचित, वंचित व बहुजन समाजाशी निष्ठा ही त्यांची बांधीलकी होती. बहुजन समाजास जागे करून स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम पूर्ण केले पाहिजे हा विचार त्यांनी दिला. महर्षी शिंदे सतत राष्ट्रीय ऐक्य, न्याय व समता यासाठी कार्यरत राहिले. त्यांचे विचार काळाच्या पुढे होते.

**निष्कर्ष**

महाराष्ट्र राज्याच्या पुरोगामीत्वाचा पाया ज्यानी रचला ते महर्षी विठ्ठल शिंदे आज इतिहासाच्या पानाआड गेले आहेत. त्यांनी राजकीय आणि आध्यात्मिक अभिसरणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे पुढे फुले आंबेडकरांच्या समग्र चळवळीला पाश्र्वभूमी तयार झाली. बहुजन समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे मोठे

कार्य केले. त्यांच्या त्यांचे विचार काळाच्या कसोटीवर सिध्द होतात. विसाव्या शतकाच्या प्रारंभी शेतसारा, आणि सावकारी पाशात अडकलेल्या बळीराजाच्या मुक्तीसाठी कृषी अर्थव्यवस्थेचा का मजबूत केला. धर्मसेवा, मद्यपानबंदी, मुरळी प्रतिबंध चळवळ, होलिका संमेलन मुलीचे शिक्षण, दुस्काळग्रस्तांना मदत, अस्पृश्यता निवारण, जातीय सलोखा यासाठी त्यांनी आपले आयुष्य -वेचले. परंतुच्यांच्या कार्याचा विसर झालेला दिसतो. आज जाती-जातीत धर्मा-धर्मात विद्वेष फैलावण्याचे काम जोरात सुरू आहे. त्यास तरुण मंडळी बळी पडत आहेत. अश्यावेळी महर्षी वि.रा. शिदेचे विचार दिपस्तयांसारखे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

*शिंदे वि. रा. - माझ्या आठवणी व अनुभव श्री लेखन-वाचन भांडार, पुणे-2 1958*
*देशपांडे मा.का - साहित्य साधना, कॉटीनेटल प्रकाशन, पुणे 30-1961*
*पाटील हिराजी - महषी शिंदे चरित्र पुणे 2-1969*
*फडके य. दी. - शाहु छ आणि लोकमानस, श्रीविद्या प्रकाशन, पुणे 1986*
*तोडमल ह. की - म. शिंदे यांचे चरित्र, कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे 1986*
*रोकडे, मनोहर - महषी वि. रा. शिदे: व्यक्ती आणि वाङमय (अप्रकाशित प्रबंध नागपूर विद्यापीठ)*
*दहातोडे भिमाजी-महषी विठ्ठल रामजी शिंदे, पद्मगंधा प्रकाशन, 2019, पुणे.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*